# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०१.१०.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नंदनवन पोलीसांची कामगीरी :— जिवे ठार मारणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक २५.०८.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी अश्विन उर्फ सोनु अमित राहांगडाले वय ३२ वर्ष रा. कुंभारटोली, जुना बगडगंज, नागपूर व त्याचा मित्र अक्षय बंडु वंजारी वय २८ वर्ष रा. बजरंग नगर, मनपा शाळेमागे, जुना बगडगंज, नागपूर तसेच इतर मित्र हे पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत एका बारमध्ये बसलेले होते. अक्षयचे पत्नीचा त्याला फोन आल्याने, तो घरी जात असता, द प्रिझम बिल्डींगसमोर, शास्त्रीनगर, कुंभारटोळी येथे आरोपी १) सुरज विलास लांजेवार वय ३० वर्ष २) वंदना विलास लांजेवार वय ४७ वर्ष दोन्ही रा. शास्त्रीनगर, कुंभारटोळी, नंदनवन ३) प्रशांत दिनेश आखरे वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ३५९, गरोबा मैदान, बगडगंज, नागपूर ४) हार्दीक मारोतीराव पालांदुरकर वय २४ वर्ष रा. प्लॉट क्र. २१०, आंबेडकर नगर लाईन, गरोबा मैदान, नागपूर ५) प्रदीप रामभाऊ आखरे वय ४५ वर्ष रा. प्लॉट क्र. ३५९, रा. गरोबा मैदान, बगडगंज, नागपूर ६) सागर शंकर मोहर्ले वय ३६ वर्ष रा. शास्त्रीनगर, एनआयटी गार्डनजवळ, नागपूर ७) किशोर उर्फ गोलु सुनिल विश्वकर्मा वय २८ वर्ष रा. प्लॉट क्र. १०१, गायत्री अपार्टमेंट, आंबेडकर चौक नागपूर यांनी संगनमत करुन फिर्यादीचा मित्र अक्षय यांनी पोलीसांना मुखबिरी केल्याने आरोपी क्र. १ चे भावास चोरीचे गुन्हयात अटक झाली अशा संशयावरुन अक्षयचे डोळयात मिरची पावडर टाकून हातबुक्कीने मारहाण केली. अक्षय याने फिर्यादीजवळ परत येऊन सांगितले व दोघेही परत घरी जात असता, आरोपींनी अक्षय यास शस्त्राने मारहाण करुन गंभीर जखमी केले. फिर्यादीने जखमी यास उपचाराकरीता एनएचएस हॉस्पिटल व तेथून एम्स् हॉस्पिटल येथे दाखल केले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपींविरुध्द कलम १०९(३), ११५(२),१८९(२),१९०,१९१(२)(३),३५१(३) भान्यासं सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. नंदनवन पोलीसांनी गुन्हयाचे तपासात आरोपींचा शोध घेऊन आरोपी क्र. १ ते ४ यांना अटक केली होती. जखमी यास उपचारादरम्यान डॉक्टरांनी दिनांक २६.०८.२०२६ चे २०.३० वा. तपासुन मृत घोषित केल्याने गुन्ह्यांमध्ये कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये कलमवाढ करण्यात आली होती. तसेच, गुन्ह्याचे तपासादरम्यान, इतर आरोपीचा शोध करीत असता, नंदनवन पोलीसांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त खात्रीशीर माहितीवरुन, गुन्ह्यातील ईतर तिन पाहीजे आरोपींना अटक करण्यात आले आहे.

गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा टोळीप्रमुख असुन, इतर आरोपी हे टोळीचे सदस्य आहेत. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी शरीराविरूध्द व मालमत्तेविरुध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. श्री वसंत पदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपूर शहर यांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी

नियंत्रण कायदा—१९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री कैलास देशमाने व तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २३.०९.२०२६ चे १०.३० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी परवेज आलम नजिर शेख, वय ३३ वर्षे, रा. सिदधार्थ नगर, प्लॉट क्र. ३६३, टेका नाका, पाचपावली यांनी त्यांची होन्डा ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच. ४९ वाय ०१८५ किंमती २०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील प्लॉट क्र. २१२, दिशा कंप्युटर क्लास, तिरंगा चौक, दमकोंडवार इलेक्ट्रानिक्स शॉपचे बाजुला लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद ॲक्टीवा गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून गुन्हयामध्ये विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न करुन, त्यास ताब्यात घेतले. त्यास विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली देऊन, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत एका ठिकाणी ०१ वाहनचोरी असे एकुण ०२ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यातुन चोरी केलेले वाहन क्र. एम.एच. ४९ वाय ०१८५ व ॲक्टिवा क्र. एमएच ४९ एक्स ५४७७ असा एकुण १ लाख रुपयांचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालक यास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**३) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— क्रिकेट सामन्यावर जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०९.२०२६ रोजी १५.०० वा. ते १५.३० वा. चे दरम्यान, मा. पोलीस आयुक्त एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, पथकप्रमुख सपोनि. भगवान कोळी यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, न्यु सुरज नगर, रिंग रोड येथे राहणारा ईसम नामे बंटी शेरु अहमद

पठान हा त्याचे राहते घरी भारत विरुध्द वेस्ट इंडीज क्रिकेट सामन्यावर ग्राहकांकडून ऑनलाईन पैसे घेऊन, क्रिकेट सट्टा चालवित आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, एस्कॉर्ट पथकाने पोलीस ठाणे भांडेवाडीचे पोलीस निरीक्षक श्री. नितीन चरडे व पंचासमक्ष बंटी शेरु अहमद पठान याचे राहते घरी रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी बंटी शेरु अहमद पठान वय ३९ वर्ष रा. न्यु सुरज नगर व त्याचा सोबती नामे विक्की अनिल बन्सोड वय २५ वर्ष रा. आयगाव, आदर्शनगर, पवनी भंडारा हे दोघे टॅबवर भारत विरुध्द वेस्ट इंडीज क्रिकेट सामना बघतांना व त्यांचे जवळील ०३ मोबाईल फोनचे मदतीने ग्राहकांकडून ऑनलाईन पैसे स्विकारुन क्रिकेट सट्टयाची खायवाडी करतांना मिळून आले. दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेऊन, त्यांचेकडून ०३ वेगवेगळे मोबाईल फोन, ०१ सॅमसंग टॅब व खायवाडीचे रोख असा एकुण १,०५,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपींविरूध्द जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात, वपोनि. नितीन चरडे, सपोनि. भगवान कोळी, पोउपनि गंगाधर मुटकुरे, पोअं. राज चौधरी, शाम कडु, आशिष गायधने व विजय गिरी यांनी केली.



**<u>४) पोलीस ठाणे लकडगंज :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्दीत जुनी मंगळवारी, धीवर मोहल्ला येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) सेवक रमेश चौधरी वय ३० वर्षे रा. हत्तीनाला, जुनी मंगळवारी २) गणेश हरीश धांडे वय २० वर्षे, रा. जुनी मंगळवारी हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. घटनास्थळी अंधार असल्याने काही इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. ताब्यातील ईसमांना पळुन गेलेल्या ईसमांची नावे विचारली असता, त्यांनी १) जावेद उर्फ मुर्गा मोहम्मद शुकुर वय ४० वर्ष रा. नवाबपुरा, कोतवाली, नागपूर २) राजेश उर्फ भुऱ्या हरीभाऊ करनुके वय ३८ वर्ष ३) खुशाल उर्फ मिठ्ठु हरीश्चंद्र पौनीकर वय ३१ वर्ष दोन्ही रा. जुनी मंगळवारी, धीवरपुरा, लकडगंज, नागपूर असे असल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख व जुगाराचे साहित्य असा एकुण १७,९३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवैध जुगार व गैरकायदेशीर प्रकारांविरुध्द यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे, करीता लपुन छपुन सुरु असलेले जुगार अड्डे किंवा जुगार खेळणारे व खेळविणारे इसम यांचेबाबत नजिकच्या पोलीस ठाणेस अथवा डायल ११२ वर संपर्क साधावा.

वरील कामगिरी पोलीस ठाणे लकडगंज येथील वपोनि. श्री. मुकुंद कवाडे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

१) **पोलीस ठाणे पाचपावली :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३०.०९.२०२६ चे १८.०० वा. ते २१.१५ वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्दीत, घर क्र. ६१९, लाडपुरा, तांडापेठ, नंदगिरी रोड, पाचपावली येथे राहणारा इसम नामे रितीक विलास पराते, वय २५ वर्ष याचे राहते घरी रेड कारवाई करून, घराची पंचासमक्ष झडती घेतली असता, बेडरुममधील लोंखंडी आलमारीमध्ये एका काळया रंगाच्या प्लास्टीक पिशवीमध्ये १० वेगवेगळया पारदर्शक प्लास्टीक पन्नीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी ५८.५३ ग्रॅम कि. ५,९००/— रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. फहीम खान यांनी दिलल्या तक्रारीवरुन, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. राजेंद्र जाधव यांनी गुन्हा दाखल करुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचे सासरे नामे रविंद्र हरीचंद्र चानोरे, वय ६७ वर्ष, रा. लाईन क्र. १८, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर हे फुल खरेदी विक्रीचे काम करतात. दिनांक २९.०९.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे सासरे हे त्यांचे ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच ३१ ई.झेड ८६५६ ने फुले घेऊन, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, अलंकार चौक, नार्थ अंबाझरी, धरमपेठ येथुन जात असता, एका अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे सासरे यांचे मोपेडला धडक दिली. त्यामुळे ते वाहनासह रोडवर खाली पडल्याने त्यांचे डोक्याला मार लागुन गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रामा सेंटर येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ३०.०९.२०२६ चे १०.० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी कमलेश घनश्याम जांगडे, वय ३४ वर्ष, रा. फ्लॅट क्र. १०८, वास्तुगंध ग्रिन सोसायटी, नरसाळा रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे सिताबर्डी पोउपनि. परशुराम भवाळ ८२०८७७५३५७ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात वाहनाचे चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सक्करदरा :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.१०.२०२६ चे ००.५० वा. चे सुमारास, सक्करदरा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गवंडीपुरा, धांडेवाडी, राहुल डेली निडस् दुकानाजवळ फिरोज खान नावाचा इसम तलवार बाळगुन फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम एका खरड्याचे बॉक्ससह दिसुन आला. त्यास आवाज दिला असता, तो पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव फिरोज खान रफीक खान वय ३३ वर्षे रा. शितलामाता मंदीर जवळ, सोलंकी पाटील वाडी, चंद्रकांत क्षीरसागर यांचे घरी किरायाने, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळील बॉक्सची पाहणी केली असता, त्यामध्ये एक जर्मनची छोटी तलवार व एक स्टीलची मुठ असलेली लोखंडी तलवार अशा दोन तलवारी किंमती १,६००/—रू. चा मुद्येमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवारी बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**४) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०९.२०२६ चे १२.२४ वा. चे सुमारास, फिर्यादीचा पुतण्या नामे रोशन मधुकर धुरड, वय ३३ वर्ष, रा. किरनापुर, ता.जि. नागपूर हा त्याचे होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच ३१ एफ.झेड ४३८७ ने पवनी, भंडारा येथे जात असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्यीत, हैदराबाद—जबलपुर हायवेवरील लडडु ढाबा समोर सोळाचाकी टाटा ट्रक क्र. डब्ल्यु ३३ एम ४००१ चा चालक आरोपी अशिद अनिल रॉय, वय ४७ वर्ष, रा. कमर फुकट, पोलीस ठाणे घोगार, ता. आरामबाग, जि. घोगली, पश्चिम बंगाल याने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे पुतण्याचे मोपेडला मागुन जोराने धडक देवुन, अपघात करुन, त्यास गंभीर जखमी करुन, त्याचे मरणास कारणीभुत झाला.

अशा फिर्यादी प्रविण विनायकराव धुरड, वय ४३ वर्ष, रा. प्लॉट क्र. ६४, गांवडे ले—आऊट, प्रतापनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मसपोनि. चंदा दंडवते ९९२३०२३४१८ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८३ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** फिर्यादी राजु पांडुरंग देऊळकर, वय ५४ वर्षे, रा. १९२, एलआयजी कॉलनी, २३/४, २८/८, न्यु नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाण नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची पुतणी नामे कु. प्रणाली नरेंद्र देऊळकर, वय १९ वर्षे ही दिनांक २६.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरुन बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, केस—काळे लांब, अंगात— निळा टॉप व काळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :—** फिर्यादी सुधाकर चंद्रभान बशीशंकर, वय ५३ वर्षे, रा. पडोळे नगर झोपडपट्टी, मिलींद फार्मसीचे बाजुला, नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाण नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे कुणाल सुधाकर बशीशंकर, वय २० वर्षे हा दिनांक २५.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरुन बेपत्ता झाला आहे. शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्याला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस—काळे, अंगात— काळा पिवळा चेक्सचा फुलबाहीचा शर्ट व काळा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :—** फिर्यादी करतारसिंग रामप्रकाशसिंग बघेल वय ४६ वर्षे, रा. २९, आदर्श नगर दिघोरी, उमरेड रोड, नागपूर यांनी पोलीस ठाण नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. कोमेशी करतारसिंग बघेल, वय १९ वर्ष ही दिनांक २७.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरुन बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस—काळे लांब, अंगात— पिवळा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



कु. प्रणाली



कुणाल



कु. कोमेशी

स्वा/–

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.